महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर,श्रध्दानदपेठ,नागपूर-२२
दुरध्वनी / फॅक्स क्र.०७१२-२२२१०४९, ई-मेल- sdswo.nagpur@gmail.com

जाक्र.सआसकना/भासशि/ २०२१-२२/ 740 दिनांक :- / /२०२२

14/12/2022

प्रति,

प्राचार्य
महाविद्यालय(सर्व)
जि. नागपूर

विषय:- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता मागासवर्गिय विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत करणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास सुचीत करण्यात येते की, सन 2021-22 या शैक्षणिक वर्षाकरीता शासनाने SC,OBC,SBC,VJNT या प्रर्वगातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क या योजनेचे महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याकरीता दिनांक 14/12/2021 पासुन ऑनलाईन प्रक्रीया सुरु झालेली आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची अंतीम मुदत दि. 31/01/2022 ही देण्यात आलेली होती. परंतु SC प्रवर्गातिल 27% व OBC,SBC,VJNT प्रवर्गातिल 31% विदयार्थ्यांनी अदयापही अर्ज भरलेले नसल्याकारणाने अर्ज भरण्याची मुदत SC प्रवर्गाकरीतादि.15/02/2022पर्यंत व OBC,SBC,VJNTया प्रवर्गाकरीता दि. 28/02/2022 पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. यानंतर विदयार्थ्यांना अर्ज भरण्याकरीता मुदत वाढविण्यात येणार नाही याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी. महाविद्यालयातील SC,OBC,SBC,VJNT या प्रर्वगातील शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जाची नोंदणी करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत महाविद्यालयाची राहील. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील वरील प्रवर्गातील सर्व पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जाची नोंदणी महाविद्यालयाने महाडीबीटी पोर्टलवर तात्काळ करुन घ्यावी.

विदयार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर भरलेले अर्ज सर्व महाविद्यालयाने तातडीने तपासणी करुन त्यापैकी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्याकडे पाठवावेत. तसेच ज्या महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क मंजुर नसतील त्या महाविद्यालयाने संबंधीत यत्रणेकडून शैक्षणिक शुल्क तातडीने मंजुर करुन घ्यावे. महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या अर्जाची नोंदणी करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावेत. कोणत्याही परिस्थीतीत मागासवर्गीय पात्र विदयार्थी या योजनेपासुन वंचित राहणार नाही , याची दक्षता घ्यावी. कोणतेही मागासवर्गीय विदयार्थी या योजनेपासुन वंचीत राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत महाविद्यालयीन प्रशासनाची राहील , याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

(आर. विमला), भाप्रसे
जिल्हाअधिकारी, नागपूर

SEAL